# वित्तीय तंत्रज्ञानाचा अवलंब करा

## डॉ. शरीक निसार यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

वित्तीय तंत्रज्ञान (फिनटेक) पुरवणाऱ्या कंपन्यांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे. निश्चलीकरण व गेल्या वर्षभरातील कोरोना संसर्ग यांमुळे संगणकीकृत व ऑनलाईन व्यवहारात वाढ होत आहे. याच अनुषंगाने बँकिंग तंत्रस्नेही होत असून त्यासाठी वित्तीय तंत्रज्ञानाचा अवलंब करणे सर्वसामान्य व कंपन्यांच्या दृष्टीने आवश्यक आहे, असे प्रतिपादन बॉम्बे स्टॉक एक्सचेंज इन्स्टिटयूटचे संशोधन सल्लागार डॉ. शरीक निसार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील के. आर. एन. गोडबोले अध्यासनामार्फत 'भारतातील वित्तीय तंत्रज्ञानाची स्वीकृती, व्याप्ती व आव्हाने' या विषयावर आयोजित व्याख्यानात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. केदार मारुलकर यांनी आभार मानले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. ए. एम. गुरव, आदी उपस्थित होते.



**गडहिंग्लज : रवळनाथ सोसायटी व ज्ञानदीप प्रबोधिनीतर्फे डॉ. पी. एस. पाटील यांचा सत्कार करताना डॉ. एन. जे. पवार. शेजारी एम. एल. चौगुले, डॉ. डी. टी. शिर्के, आनंदराव पाटील, मीना रिंगणे.**

# शिवाजी विद्यापीठ जगात अग्रेसर ठरावे : डॉ. पवार

## 'रवळनाथ-ज्ञानदीप'तर्फे कुलगुरू, प्र-कुलगुरूंचा सत्कार

गडहिंग्लज, ता. १७ : शिवाजी विद्यापीठ देशातील पहिल्या दहा विद्यापीठांत आहे. ते जगातील पहिल्या ५० विद्यापीठांच्या यादीत येऊन जगात अग्रेसर ठरावे, अशी अपेक्षा डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन. जे. पवार यांनी व्यक्त केली.

येथील रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी व ज्ञानदीप प्रबोधिनीतर्फे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा सत्कार केला. याप्रसंगी डॉ. पवार बोलत होते. भारती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष आनंदराव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

बालवैज्ञानिक अथर्व कदम, प्रा. विजय आरबोळे, सोनाबाई पाटील, अनंत मायदेव, काशिबाई चौगुले, उमा तोरगल्ली, विजय घुगरे, रेखा पोतदार, एस. एन. देसाई, मारुती दळवी, शंकर कांबळे, शरद टोपले, भैरु वालीकर यांचा सत्कार झाला.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, "शिवाजी विद्यापीठाची गुणवत्ता जागतिक पातळीवर नेण्यासाठी प्रयत्नशील आहे. मानांकनात संशोधनाला महत्त्व असल्याने त्यावरच भर दिला जाईल. रवळनाथचे कार्य आर्थिक क्षेत्राबरोबरच बौद्धिक क्षेत्रातही उल्लेखनीय आहे."

प्राचार्या मीना रिंगणे यांनी स्वागत केले. रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. डी. आर. मोरे, डॉ. एच. व्ही. देशपांडे, जे. बी. बारदेस्कर, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. दत्ता पाटील, डॉ. मंगलकुमार पाटील उपस्थित होते.

# सकाळ ग्रंथोत्सवाचे उद्घाटन

## अक्षर दालनात वाचकांना बौद्धिक मेजवानी : विविध विषयांवरील ३५० पुस्तके




**कोल्हापूर : सकाळ ग्रंथोत्सवाचे उद्घाटन अक्षर दालन येथे बुधवारी झाले. यावेळी पुस्तक चाळताना सुप्रिया वकील, प्रा. डॉ. पी. एस. पाटील.**

कोल्हापूर, ता. १७ : सकाळ प्रकाशन व अक्षर दालन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ग्रंथोत्सवाला आज प्रारंभ झाला. शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते ग्रंथोत्सवाचे उद्घाटन झाले.

हा ग्रंथोत्सव कोळेकर तिकटी येथील अक्षर दालनमध्ये २५ फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार आहे. यामध्ये वाचकांना अध्यात्म, कृषी, राजकारण, आंतरराष्ट्रीय राजकारण, स्पर्धा परीक्षा, मराठी साहित्य अशा विविध विषयांवरील सुमारे ३५० पुस्तके पाहता येतील. ग्रंथोत्सवातील खरेदीवर २५ टक्क्यांची सूटही मिळणार आहे.

समाजातील विविध घडामोडींवर भाष्य करणारी नामवंत लेखकांची पुस्तके सकाळ प्रकाशन प्रकाशित करते. ज्ञानवर्धक आणि माहितीपूर्ण वाचनाचा आनंद ही पुस्तके देतात. या ग्रंथ प्रदर्शनात शेती, अध्यात्म, तत्त्वज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञान, माहितीपर, अर्थ विषयक, पालकत्व, स्पर्धा परीक्षा, वैचारिक ललित अशा विविध प्रकारची पुस्तके आहेत.

याशिवाय 'सकाळ'चे संपादक संचालक श्रीराम पवार, डॉ. जयंत नारळीकर, डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. जगन्नाथ दीक्षित, शशि थरूर, जयराम रमेश, शिवराज गोर्ले, मंगला गोडबोले या नामवंत लेखकांबरोबरच प्रताप चिपळूणकर, डॉ. प्रशांत नाईकवाडी, डॉ. नितीन मार्कंडेय, तेजस शेंडे, दिलीपराव देशमुख बारडकर अशा कृषी तज्ज्ञांची पुस्तकेही ग्रंथोत्सवात आहेत. पुस्तक खरेदीवर आकर्षक २५ टक्के सवलत ग्रंथोत्सवातील खरेदीवर देण्यात येईल.

याखेरीज १२०० रुपये आणि त्यापुढील पुस्तक खरेदीवर वाचक, वाचनालये व अन्य संस्थांसाठी ४०टक्के सवलत दिली जाणार आहे. सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत ग्रंथोत्सवाला भेट देता येईल.

उद्घाटनप्रसंगी सकाळ प्रकाशनचे व्यवस्थापक नदीम रावळ, लेखिका सुप्रिया वकील, अक्षरदालनचे रवींद्रनाथ जोशी, अमेय जोशी, अलोक जोशी, गुरुनाथ जोशी, राहुल कुलकर्णी हे उपस्थित होते.

सकाळ प्रकाशन पुस्तकांच्या माहितीसाठी ७७७६०४५५५६ या क्रमांकाशी संपर्क साधावा.

# शिवाजी विद्यापीठ, करवीर तालुका विजयी

- पॅकर्स व रमेश कदम क्रिकेट ॲकॅडमीवर मात
- जिल्हा क्रिकेट असो.च्या क गट टी - २० क्रिकेट स्पर्धा

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन आयोजीत 'क" गट टी – २० क्रिकेट स्पर्धेत सोमवारी झालेल्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघ व करवीर तालुका क्रिकेट असोसिएशन 'क" संघांनी प्रतिस्पर्धी संघांवर विजय संपादन केला.

पहिल्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाने प्रथम फलदांजी करताना २० षटकांत ९ बाद १४७ धावा केल्या. यामध्ये सागर पोवार ४० (३०), विश्वनाथ वरूटे २२, रमेश ढोणुक्षे व अभिजीत कोठावळे प्रत्येकी १७ धावा केल्या. पॅकर्स क्रिकेट क्लबकडून कृष्णा वर्मांने ३, शुभम घोटगाळकरने २, कृष्णा अग्रवाल व वेंदात पाटील यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. पॅकर्सने २० षटकांत ४ बाद ८७ धावा केल्या. यामध्ये युग सारस्वत ३५, शुभम घोटगाळकर २७, धावा केल्या. विद्यापीठकडुन योगेश साध्वी, शशिकांत दाभाडे, सिध्दार्थ लोखंडे व अनिल साळोखे यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. अशा विद्यापीठ संघाने ६० धावानी विजय संपादन केला.

दुसऱ्या सामन्यात रमेश कदम क्रिकेट ॲकॅडमीने २० षटकांत ९ बाद ८७ धावा केल्या. यामध्ये विश्वजीत कावळे १६, करण सावर्डेकर १०, ओमकार दिघे ९ धावा केल्या. करवीर क्रिकेट असो. क कडुन पठाणने ४, पवन पांचाळ, वर्चस्व मोरे, आर्यन देसाई, आय्यान सय्यद यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. करवीर तालुका संघाने १२.४ षटकांत २ बाद ८८ धावा केल्या. यामध्ये वर्चस्व मोर नाबाद २९, मुस्तकी पठाण नाबाद २३ धावा केल्या. रमेश कदमकडून ओमकार दिघेने १ बळीं घेतला. अशा प्रकारे करवीर किकेट असो. क ने सामना ८ विकेटनी जिंकला.